ePaper

## बिहारमध्ये पुन्हा राजकीय भूकंप? RJD चे 15-16 आमदार मारणार पलटी



वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™

WWW.MAHAENEWS.COM | गुरुवार, दि. 13 ऑगस्ट 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!


पान 3 वरुन...

मोशी दुर्घटनेत मृत कामगाराच्या २३ वर्षीय पत्नीची आत्महत्या

### शिवसेना नाव व चिन्ह प्रकरणात नवा ट्विस्ट; सिब्बल यांचा जोरदार युक्तिवाद

# अपात्र व्यक्तीला 'मुख्यमंत्री' केलं..?

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**शिवसेना पक्ष आणि ‘धनुष्यबाण’ चिन्हाच्या वादावर सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेल्या सुनावणीत ठाकरे गटाचे ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी निवडणूक आयोगाच्या निर्णयावर जोरदार आक्षेप घेतला. आयोगाने आपल्या अधिकारक्षेत्राच्या पलीकडे जाऊन निर्णय घेतल्याचा दावा त्यांनी केला.**

एकनाथ शिंदे यांच्या बंडानंतर शिवसेनेत दोन गट निर्माण झाले. त्यानंतर निवडणूक आयोगाने शिंदे गटाला शिवसेना पक्षाचे नाव आणि ‘धनुष्यबाण’ चिन्ह दिले. या निर्णयाला ठाकरे गटाने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे.

सिब्बल यांनी २०१८च्या शिवसेना पक्षघटनेचा मुद्दा उपस्थित केला. त्यावेळी पक्षघटनेवर आक्षेप घेण्यात आला नव्हता, मात्र नंतर ती अमान्य असल्याची भूमिका घेण्यात आली, असा युक्तिवाद त्यांनी केला. पक्षाचे कामकाज पक्षघटनेनुसार सुरू असताना अचानक स्वतंत्र कार्यकारिणी उभी करण्याचा आधार काय, असा सवालही त्यांनी उपस्थित केला.




### सात न्यायाधीशांच्या घटनापीठाकडे प्रकरण पाठवण्याची मागणी

सिब्बल यांनी या प्रकरणातील एका महत्त्वाच्या घटनात्मक मुद्द्याचा सात न्यायाधीशांच्या घटनापीठाकडून पुनर्विचार करण्याची मागणी केली. पक्षाचे नाव आणि चिन्ह याबाबत निवडणूक आयोग निर्णय घेऊ शकतो आणि त्याच वेळी आमदारांच्या अपात्रतेचा प्रश्न विधानसभा अध्यक्षांकडे राहू शकतो, या आधीच्या घटनापीठाच्या भूमिकेवर त्यांनी प्रश्न उपस्थित केला. कारण हे दोन्ही मुद्दे एकमेकांशी संबंधित असतील, तर त्यांचे स्वतंत्रपणे निर्णय घेतल्यामुळे विरोधाभासी परिस्थिती निर्माण होऊ शकते, असा सिब्बल यांचा युक्तिवाद होता.

### ‘पक्षाची नोंदणी रद्द करण्याचा पर्याय होता’

शिवसेनेच्या पक्षघटनेबाबत आक्षेप असेल तर त्यावर योग्य कायदेशीर प्रक्रिया करणे आवश्यक होते. मात्र पक्षाच्या संघटनात्मक रचनेवर प्रश्न उपस्थित करून थेट पक्षाचे नाव आणि चिन्ह दुसऱ्या गटाला देणे योग्य नाही, अशी भूमिका सिब्बल यांनी मांडली. त्यांनी असा युक्तिवाद केला की, जर आयोगाला पक्षाच्या घटनेत गंभीर त्रुटी वाटत होत्या, तर त्यासाठी कायद्यातील योग्य प्रक्रिया करणे अपेक्षित होते.

### ‘लोकशाही आणि कायद्याचे राज्य महत्त्वाचे’

सुनावणीदरम्यान सिब्बल यांनी हा प्रश्न केवळ शिवसेना किंवा एका राजकीय पक्षापुरता मर्यादित नसल्याचे सांगितले. पक्षांतर आणि आमदारांच्या अपात्रतेबाबत वेळेवर निर्णय न होणे ही लोकशाहीसमोरील मोठी समस्या असल्याचे त्यांनी म्हटले.

सत्तेत असलेल्या कोणत्याही पक्षाला अपात्रतेच्या प्रकरणांवर निर्णय लांबवण्यात राजकीय फायदा होऊ शकतो, असा मुद्दाही त्यांनी मांडला. न्यायालयानेही लोकशाहीचे रक्षण करणे ही केवळ एका संस्थेची जबाबदारी नसून ती सामूहिक जबाबदारी असल्याचे निरीक्षण नोंदवले.

आता या सुनावणीत सर्वोच्च न्यायालय निवडणूक आयोगाच्या निर्णयाकडे, आमदारांच्या अपात्रतेच्या प्रश्नाकडे आणि पक्षाच्या संघटनात्मक बहुमताच्या मुद्द्याकडे कशा पद्धतीने पाहते, हे महत्त्वाचे ठरणार आहे. शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण चिन्हावर अंतिम निर्णय काय होणार, याकडे ठाकरे आणि शिंदे या दोन्ही गटांसह महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

### ‘पक्षांतराला प्रोत्साहन मिळू नये’

सिब्बल यांनी पक्षांतरविरोधी कायद्याच्या उद्देशाचाही मुद्दा उपस्थित केला. त्यांच्या मते, एखादा आमदार पक्षातून बाहेर पडतो, सत्तेत सहभागी होतो आणि त्यानंतर त्याच्याकडे असलेल्या सत्तेच्या जोरावर अधिक आमदारांचा पाठिंबा मिळवतो, अशी प्रक्रिया कायद्याच्या मूळ उद्देशालाच धक्का देऊ शकते. पक्षांतर रोखण्यासाठी करण्यात आलेल्या कायद्याचा अर्थ अशा प्रकारे लावता येणार नाही की, त्यातून पक्षांतर करणाऱ्यालाच राजकीय फायदा मिळेल, अशी भूमिका त्यांनी मांडली.

### कलम 29A च्या अधिकारांवरही प्रश्न

सुनावणीदरम्यान सिब्बल यांनी लोकप्रतिनिधित्व कायद्यातील कलम 29A आणि निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वांचा मुद्दाही उपस्थित केला. पक्षाच्या घटनेत झालेल्या प्रत्येक बदलाची माहिती निवडणूक आयोगाला देण्याची सक्ती नेमकी कोणत्या कायदेशीर तरतुदीतून येते, असा सवाल त्यांनी केला. 2010 मध्ये आयोगाने काही मार्गदर्शक तत्त्वे तयार केली होती. मात्र त्या वेळी शिवसेना आधीच नोंदणीकृत पक्ष होता. त्यामुळे या मार्गदर्शक तत्त्वांचा वापर करून नंतर पक्षाच्या संघटनात्मक रचनेवर प्रश्न उपस्थित करता येईल का, असा मुद्दा सिब्बल यांनी मांडला.

# ‘ससून’मधील आयसीयू बेड वाढणार!

## आणखी ३४ नवीन खाटांचा प्रस्ताव; गंभीर रुग्णांना दिलासा

**महाईन्यूज । पुणे**

**पश्चिम महाराष्ट्रासह अनेक जिल्ह्यांचा वैद्यकीय भार असणाऱ्या ससून सर्वोपचार रुग्णालयातील अतिदक्षता विभागातील खाटांच्या तुटवड्यावर प्रशासनाकडून तातडीने उपाययोजना सुरू करण्यात आल्या असून, अतिदक्षता विभागाच्या खाटांची संख्या ३४ ने वाढवण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. यासाठीचा प्रस्ताव वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाकडे पाठवण्यात आला आहे. त्यातील २० नवीन खाटांना मंजुरी मिळाली आहे.**




ससून रुग्णालयावर सध्या अतिदक्षता विभागात भरती करावी लागू शकेल, अशा गंभीर रुग्णांचा मोठा ताण येत आहे. सध्या रुग्णालयातील वेगवेगळ्या ९ विभागांत एकूण १६२ खाटा अतिदक्षता विभागासाठी उपलब्ध आहेत. मात्र, ऐन वेळी एखाद्याला खाट मिळाली नाही, तर जिवाला धोका निर्माण होऊ शकतो. अशाच एका घटनेनंतर अतिदक्षता विभागात खाट न मिळाल्यामुळे एका रुग्णाचा मृत्यू झाल्याचा दावा करण्यात आला. या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन रुग्णालय प्रशासनाने अतिदक्षता विभागाचा विस्तार वेगाने करण्याचा निर्णय घेतला आहे.

सध्याच्या प्रस्तावानुसार, वैद्यकीय अतिदक्षता विभागाचा विस्तार करून त्यात नवीन १४ खाटा वाढवण्यात येणार आहेत. या प्रस्तावाला लवकरच मंजुरी मिळण्याची शक्यता आहे. याशिवाय, शस्त्रक्रिया झालेल्या रुग्णांसाठी अतिदक्षता विभागात १० अतिरिक्त खाटा आणि हृदयरोगाच्या रुग्णांसाठी १० अतिरिक्त खाटांच्या प्रस्तावाला वैद्यकीय शिक्षण विभागाने मंजुरी दिली आहे. त्यामुळे या दोन्ही विभागांतील खाटांची संख्या प्रत्येकी १० वरून २० वर पोहोचली आहे. उर्वरित १४ खाटांची मंजुरी मिळताच ससूनमधील एकूण अतिदक्षता विभागातील खाटांची क्षमता १६२ वरून १९६ वर जाईल.

रुग्णालयातील अपघात व आपत्कालीन उपचार विभागाची क्षमता सुधारण्यावरही भर दिला जात आहे. सध्या या विभागात ३० खाटा उपलब्ध असून, त्यात आणखी २० खाटांची भर घालून, ही क्षमता ५० खाटांपर्यंत नेण्याच्या प्रस्तावाला मंजुरी मिळाली आहे.

याविषयी माहिती देताना , ससून रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. एकनाथ पवार म्हणाले की, ससूनमधील अतिदक्षता विभागात सध्या १६२ खाटा आहेत. रुग्णांची गरज ओळखून अतिरिक्त ३४ खाटांचा प्रस्ताव पाठवण्यात आला. त्यापैकी २० खाटांना हिरवा कंदील मिळाला आहे. उर्वरित १४ खाटांना मंजुरी मिळताच जास्तीत जास्त गरजू रुग्णांना तत्पर आणि दर्जेदार वैद्यकीय उपचार देणे शक्य होईल.

> अतिदक्षता विभागातील खाटांची संख्या वाढणे ही चांगली बाब आहे. त्यामुळे अधिकाधिक गंभीर रुग्णांना वेळेत उपचार व सेवा देणे शक्य होणार आहे. तसेच पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनाही प्रत्यक्ष गंभीर रुग्णांच्या उपचाराचा अधिक अनुभव मिळणार आहे.
>
> **- डॉ. राजेश कार्यकर्ते, उपअधिष्ठाता व पदव्युत्तर अभ्यासक्रम प्रमुख, बी.जे. वैद्यकीय महाविद्यालय**

# चाकणमधील उद्योगांचे स्थलांतर थांबविण्यासाठी सरकार ‘ॲक्शन मोड’वर!

**महाईन्यूज । पुणे**

**चाकण परिसरातील पायाभूत सुविधांसह रस्त्यांच्या दुरवस्थेबाबत गेल्या काही दिवसांपासून गदारोळ सुरु आहे. रस्त्यांच्या समस्येमुळे चाकणमधील काही कंपन्या महाराष्ट्राबाहेर किंवा राज्यातील अन्य जिल्ह्यांमध्ये स्थलांतरित होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत असून, त्यातून रोजगारावर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. या पार्श्वभूमीवर राज्य सरकार ‘ॲक्शन मोड’वर गेले असून, उद्योगमंत्री उदय सामंत यांनी उद्योजकांशी दूरध्वनीवरून थेट चर्चा सुरू केली आहे.**



चाकण हे महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासातील महत्त्वाचे केंद्र असून, येथील उद्योगांना आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे आणि उद्योजकांना येणाऱ्या अडचणी दूर करणे याला शासनाचे प्राधान्य आहे. रस्ते, वाहतूक तसेच इतर पायाभूत सुविधांबाबत उद्योजकांच्या असलेल्या अडचणी प्रत्यक्ष जाणून घेऊन संबंधित विभागांच्या समन्वयातून त्यावर तातडीने उपाययोजना करण्याचा प्रयत्न केला जाईल. चाकणच्या औद्योगिक विकासाला गती देताना उद्योजकांच्या अडचणी सोडविण्यासाठी शासन सकारात्मक असून, संबंधित सर्व घटकांशी संवाद साधून ठोस निर्णय घेतले जातील, असे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी सांगितले.



उद्योगमंत्री उदय सामंत यांनी आज चाकणमधील औद्योगिक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांशी दूरध्वनीवरून चर्चा केली. उद्योजकांच्या समस्या केवळ चर्चेपुरत्या न ठेवता त्या प्रत्यक्ष समजून घेऊन त्यावर मार्ग काढण्याच्या दृष्टीने १६ ऑगस्टला दुपारी ४ वाजता चाकणमध्ये उद्योजक आणि औद्योगिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांसोबत प्रत्यक्ष बैठक घेण्यात येणार आहे.

चाकणमधील औद्योगिक संघटनांनीही उद्योगमंत्र्यांसोबत होणारी चर्चा सकारात्मक पद्धतीने करण्याचे आश्वासन दिले आहे. उद्योग महाराष्ट्रातून स्थलांतरित होण्याची परिस्थिती निर्माण होऊ नये, तसेच विद्यमान उद्योगांचे संरक्षण करून चाकण परिसरातील रोजगाराच्या संधी कायम राहाव्यात, यासाठी शासन आणि औद्योगिक क्षेत्र यांच्यात समन्वयातून मार्ग काढला जाईल.

### नेमका प्रकार काय?

चाकण हे देशातील सर्वात मोठे वाहननिर्मिती केंद्र आहे. मात्र, खराब रस्ते, वाहतूककोंडी आणि पायाभूत सुविधांची दयनीय अवस्था यांचा फटका उद्योगांना बसत आहे. त्यामुळे २० लघुउद्योगांनी सातारा जिल्ह्यातील खंडाळा औद्योगिक क्षेत्रात स्थलांतरित होण्याची तयारी केली आहे. हे उद्योग स्थलांतरित झाल्यास या परिसराचे वार्षिक एक हजार कोटी रुपयांचे नुकसान होऊन सुमारे चार हजार प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार धोक्यात येऊ शकतात.

# नागरी समस्यांवर वर्णेकरांचा प्रशासनाला दणका!

## तळवडे, सहयोगनगर, त्रिवेणीनगरसह स्पाईननगरातील प्रश्न तातडीने सोडविण्याची मागणी

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**स्पाईननगर, तळवडे, सहयोगनगर आणि त्रिवेणीनगर परिसरातील विविध नागरी समस्यांबाबत स्थायी समिती सदस्या तथा नगरसेविका शितल वर्णेकर यांनी प्रशासनाकडे आक्रमकपणे पाठपुरावा सुरू केला आहे. नागरिकांना भेडसावणाऱ्या मूलभूत समस्यांचे तातडीने निराकरण करावे, अशी मागणी त्यांनी फ प्रभाग क्षेत्रीय अधिकारी अतुल पाटील यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.**



या चारही परिसरातील नागरिकांकडून विविध नागरी समस्यांबाबत सातत्याने तक्रारी प्राप्त होत असून, नागरिकांना मूलभूत सुविधा वेळेत व दर्जेदार स्वरूपात उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही तातडीने करावी, अशी मागणी वर्णेकर यांनी केली आहे.

आरोग्य विभागामार्फत स्वच्छता, फॉगिंग, कचरा संकलन आणि इतर प्रलंबित समस्यांचे तातडीने निराकरण करण्याची मागणी त्यांनी केली आहे. परिसरात नियमित आणि पुरेसा शुद्ध पाणीपुरवठा सुनिश्चित करण्याबरोबरच पाणीपुरवठ्याशी संबंधित तक्रारींचेही निराकरण करण्याची सूचना करण्यात आली आहे.

तसेच ड्रेनेज व सांडपाणी व्यवस्थेतील त्रुटी दूर करून तुंबलेल्या गटारी व चेंबरची नियमित स्वच्छता करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. स्थापत्य विभागाने प्रलंबित विकासकामे मार्गी लावावीत, रस्त्यांवरील खड्डे बुजवावेत, खराब झालेले रस्ते व पदपथांची तातडीने दुरुस्ती करावी, असेही निवेदनात नमूद आहे.

सार्वजनिक रस्ते व पदपथांवर झालेले अनधिकृत टपऱ्या, अतिक्रमणे व अडथळ्यांवर नियमानुसार तात्काळ कारवाई करण्याची मागणीही वर्णेकर यांनी केली आहे. बंद अथवा खराब झालेले पदपथ दुरुस्त करून आवश्यक त्या ठिकाणी नवीन पदपथ उभारावेत, अशी मागणी त्यांनी केली. नागरी समस्यांवर तातडीने कार्यवाही करून करण्यात आलेल्या उपाययोजनांचा अहवाल उपलब्ध करून द्यावा, अशी मागणीही त्यांनी प्रशासनाकडे केली आहे.

> “स्पाईननगर, तळवडे, सहयोगनगर आणि त्रिवेणीनगर परिसरातील नागरिकांना मूलभूत सुविधा मिळणे हा त्यांचा हक्क आहे. स्वच्छता, पाणीपुरवठा, ड्रेनेज, रस्ते, पदपथ आणि अतिक्रमणांसारख्या प्रश्नांकडे प्रशासनाने गांभीर्याने पाहून तातडीने कार्यवाही करावी. नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित या समस्या प्रलंबित ठेवून चालणार नाही. संबंधित विभागांनी वेळेत कामे पूर्ण करून त्याचा अहवाल द्यावा, यासाठी आपण सातत्याने पाठपुरावा करणार आहोत”
>
> **- शितल वर्णेकर,** नगरसेविका, भाजपा.



## मोशी दुर्घटनेत मृत कामगाराच्या २३ वर्षीय पत्नीची आत्महत्या

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या मोशी येथील कचरा डेपोमध्ये ८ जुलै रोजी झालेल्या दुर्घटनेत मृत्यू झालेल्या एका व्यक्तीच्या पत्नीने गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. आत्महत्येचे नेमके कारण अद्याप समजू शकले नसल्याचे पोलिसांनी सांगितले.

मोशी दुर्घटनेत नागेश गायकवाड (वय २६) यांचा मृत्यू झाला होता. त्यांच्या पत्नी सोनाली गायकवाड (वय २३) यांनी बुधवारी सायंकाळी सातच्या सुमारास राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. त्यांना दोन मुली आहेत.

सहायक पोलीस आयुक्त सुधाकर यादव यांनी याबाबत माहिती दिली. सोनाली या बुधवारी सायंकाळी एकट्याच घरी होत्या. सातच्या सुमारास त्यांनी राहत्या घरी ओढणीच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. कुटुंबातील सदस्य घरी आल्यानंतर त्यांच्या खोलीचा दरवाजा वाजविला. पण, त्यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही. दरवाजा तोडल्यानंतर त्या लटकलेल्या अवस्थेतत दिसल्या. त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. परंतु, उपचारापूर्वीच डॉक्टरांनी मृत्यू झाल्याचे घोषित केले. महापालिकेच्या वायसीएम रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात येणार आहे. याप्रकरणी भोसरी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

# पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या नव्या बोधचिन्हाला स्थायी समितीची मंजुरी

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या अधिकृत बोधचिन्हाबाबत (LOGO) एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि दूरगामी निर्णय घेण्यात आला आहे. महापालिकेच्या आगामी बोधचिन्हामध्ये आता छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ प्रतिमेचा आणि “कटिबद्ध जनहिताय” या प्रेरणादायी ब्रीदवाक्याचा अधिकृतपणे समावेश करण्यात आला असून, या महत्त्वपूर्ण विषयास स्थायी समितीची मंजुरी मिळाली आहे. स्थायी समितीचे सभापती अभिषेक बारणे यांनी या विषयास मंजुरी दिली आहे.**





या संदर्भातील प्रशासनाच्या ठरावानुसार, महानगरपालिकेच्या नवीन म्युरल किंवा बोधचिन्हाचा अंतिम नमुना मान्य करण्यात आला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा व राजसत्तेच्या लोककल्याणकारी मूल्यांचा आदर्श समोर ठेवून या बोधचिन्हाची रचना करण्यात आली आहे. महापालिकेच्या वतीने जनहिताची कामे करताना हे बोधचिन्ह व त्यावरील “कटिबद्ध जनहिताय” हा संदेश प्रशासकीय व सामाजिक बांधिलकीची साक्ष देणार आहे. हा अंतिम नमुना मान्य झाल्यानंतर, आता आवश्यकतेनुसार योग्य आकारमानात महानगरपालिकेच्या सर्व मुख्यालयामध्ये, तसेच विविध विभागांच्या इमारतींमध्ये दर्शनी ठिकाणी हा बोधचिन्ह फलक लावण्यात येणार आहे. या संपूर्ण प्रक्रियेची तातडीने अंमलबजावणी करण्यासाठी आणि त्यासंदर्भातील पुढील सर्व आवश्यक प्रशासकीय कार्यवाही वेगाने पूर्ण करण्यास प्रशासकीय पातळीवर मान्यता प्रदान करण्यात आली आहे.



## भूमिका

**नीट परीक्षेतील पेपरफुटी, प्रवेशप्रक्रियेतील गैरव्यवहार आणि शिक्षण व्यवस्थेतील त्रुटींविरोधात जेन झीने देशभर आवाज उठवला. मात्र या आंदोलनातून शासन आणि शैक्षणिक यंत्रणांनी पुरेसा धडा घेतल्याचे दिसत नाही. राज्यातील विधि महाविद्यालयांच्या प्रवेशप्रक्रियेत निर्माण झालेला गोंधळ हे त्याचे ताजे उदाहरण आहे.**

# कायद्याच्या शिक्षणाआधीच कायदेभंग!



कायद्याचे शिक्षण देणाऱ्या संस्थांनीच नियमांची पायमल्ली करावी, ही स्थिती गंभीर आणि लज्जास्पद आहे.

विधि महाविद्यालयांना विद्यापीठाची संलग्नता आणि बार कौन्सिल ऑफ इंडियाची मान्यता मिळविण्यासाठी आवश्यक शैक्षणिक सुविधा, पात्र प्राध्यापक, कर्मचारी, इमारत आणि इतर निकष पूर्ण करणे बंधनकारक आहे. मात्र अनेक महाविद्यालयांकडून या नियमांकडे सातत्याने दुर्लक्ष केले जाते. काही शासकीय संस्थांमध्येही प्रभारी प्राचार्य, कंत्राटी कर्मचारी आणि अपुऱ्या सुविधांमुळे गुणवत्तेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

यंदा या त्रुटींवर विद्यापीठे आणि बार कौन्सिलने कठोर भूमिका घेतल्याने प्रवेशप्रक्रियेच्या पहिल्या फेरीत राज्यातील ३६३ पैकी तब्बल १९४ विधि महाविद्यालयांचा समावेश होऊ शकला नाही. परिणामी सुमारे ३८ हजार जागांसाठी नोंदणी केलेल्या ६७ हजार विद्यार्थ्यांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागला. पसंतीची महाविद्यालये यादीत नसल्याने अनेक विद्यार्थ्यांनी पसंतीक्रमही भरला नाही. काही महाविद्यालयांना न्यायालयाचे दरवाजे ठोठवावे लागले आणि त्यानंतर त्रुटींची पूर्तता करण्यासाठी मुदत मिळाली.

महाविद्यालयांमध्ये शैक्षणिक सुविधा असायलाच हव्यात, याबाबत कोणतेही दुमत नाही. प्रश्न आहे तो कारवाईच्या वेळेचा. प्रवेशप्रक्रिया सुरू होण्याच्या काही दिवस आधी नियमांची अंमलबजावणी करण्यापेक्षा वर्षभर नियमित तपासणी करून त्रुटी दूर करण्याची जबाबदारी संबंधित यंत्रणांची आहे. महाविद्यालयांना वारंवार संधी देऊनही नियमांची पूर्तता होत नसेल, तर त्यांच्यावर आधीच कारवाई होणे आवश्यक आहे. सीईटी सेलने उपलब्ध महाविद्यालयांच्या आधारे प्रवेशप्रक्रिया सुरू केली; परंतु जवळपास निम्म्या महाविद्यालयांचा समावेशच नसताना प्रक्रिया सुरू करणे विद्यार्थ्यांच्या हिताचे नव्हते. नियमांचे पालन महत्त्वाचे असले, तरी त्या नियमांच्या अंमलबजावणीत विद्यार्थ्यांचे नुकसान होणार नाही, याची काळजी घेणेही तितकेच आवश्यक आहे.

उच्च व तंत्रशिक्षण विभाग, विद्यापीठे, बार कौन्सिल आणि सीईटी सेल यांनी परस्पर समन्वयाने वर्षभर देखरेख ठेवली, तर असा गोंधळ टाळता येईल. शिक्षण व्यवस्थेतील ढिसाळपणा आणि वारंवार होणाऱ्या प्रवेशगोंधळामुळे विद्यार्थ्यांचा संयम सुटत आहे. कायद्याचे शिक्षण घेण्याआधीच विद्यार्थ्यांना व्यवस्थेच्या अन्यायाविरुद्ध संघर्ष करावा लागणे, ही शिक्षणव्यवस्थेसाठी धोक्याची घंटा आहे. जेन झीचा पुढील उद्रेक टाळायचा असेल, तर यंत्रणांनी आता तरी जागे होऊन जबाबदारीने काम करणे गरजेचे आहे.

## प्रासंगिक »

### चतुर शेतकरी

**एका गावात रामू नावाचा गरीब शेतकरी राहत होता. तो खूप मेहनती होता; पण त्याच्या शेतात वारंवार पाणी कमी पडत असे. एकदा गावातील श्रीमंत सावकाराने रामूला सांगितले, “तू माझ्याकडून पैसे घे आणि मोठी विहीर खोद. पीक चांगले आले की पैसे परत कर.”**

रामूने विचार केला आणि सावकाराकडून कर्ज घेतले. त्याने विहीर खोदली; पण काही दिवसांनी विहिरीतील पाणी आटू लागले. सावकाराने कर्जाची परतफेड करण्यासाठी तगादा लावला.

रामू चिंतेत पडला. एके दिवशी गावातील वृद्ध शेतकऱ्याने त्याला सांगितले, “फक्त विहिरीवर अवलंबून राहू नकोस. शेताभोवती चर खोद आणि पावसाचे पाणी साठव.” रामूने त्याप्रमाणे काम केले. पुढच्या पावसाळ्यात भरपूर पाणी साठले.

त्याचे पीक भरघोस आले. त्याने सावकाराचे कर्ज फेडले आणि पुढेही चांगली शेती करू लागला.सावकाराने विचारले, “तुझ्या यशाचे रहस्य काय?” रामू हसून म्हणाला, “अडचण आली की दुसऱ्यावर अवलंबून राहण्यापेक्षा योग्य उपाय शोधला पाहिजे.”

- तात्पर्य : **संकटात घाबरू नका; बुद्धी आणि प्रयत्नांनी मार्ग नक्की सापडतो.**

**गडचिरोलीच्या जपतलाई आश्रमशाळेत तीन आदिवासी मुलींचा सर्पदंशाने झालेला मृत्यू हा केवळ दुर्दैवी अपघात म्हणून दुर्लक्षित करता येणार नाही. पंधरा दिवसांपूर्वी मेळघाटातील चार शासकीय आदिवासी आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांना अन्नातून विषबाधा झाली होती.**

# सर्पदंश नव्हे, प्रशासनाच्या बेफिकिरीचे बळी!



या घटना प्रशासनासाठी नवीन नाहीत. नवीन आहे ती केवळ बळींची संख्या. वर्षानुवर्षे आश्रमशाळांच्या दुरवस्थेकडे दुर्लक्ष होत राहिल्याने निष्पाप विद्यार्थ्यांच्या जीवावर बेतणारी परिस्थिती निर्माण झाली आहे.

राज्यात १,०५३ आदिवासी आश्रमशाळा आहेत. त्यापैकी ४९७ शासकीय, तर ५५६ अनुदानित आहेत. गडचिरोलीतच ९० आश्रमशाळा आहेत. त्यामुळे जपतलाईची घटना ही एकट्या शाळेची समस्या मानून चालणार नाही. अपुऱ्या सुविधा, असुरक्षित इमारती, जमिनीवर झोपणारी मुले, अपुरी वैद्यकीय व्यवस्था आणि कागदोपत्री होणाऱ्या तपासण्या या प्रश्नांकडे गांभीर्याने पाहण्याची वेळ आली आहे. दीड वर्षापूर्वी मंत्री, लोकप्रतिनिधी आणि अधिकाऱ्यांनी आश्रमशाळांमध्ये मुक्काम करून विद्यार्थ्यांच्या समस्या जाणून घेतल्या.

त्या वेळी विद्यार्थ्यांच्या अडचणी प्रत्यक्ष दिसल्या असतील, तर त्यानंतर सुधारणा कुठे झाल्या? २५ वर्षांपासून खाटा नसलेल्या शाळेत विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न प्रशासनाच्या लक्षात आला नाही, ही बाबच व्यवस्थेच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करते. पाहणी, बैठक आणि अहवाल यापलीकडे ठोस कृती झाली नाही, तर अशा उपक्रमांचे प्रयोजन काय? सर्पदंशाचा धोका असलेल्या गडचिरोलीसारख्या भागात प्रतिबंधक उपाय, प्रशिक्षित कर्मचारी, प्राथमिक उपचार आणि तातडीची वैद्यकीय मदत उपलब्ध असणे आवश्यक आहे. सर्पदंशाच्या घटना वाढत असताना त्याकडे दुर्लक्ष करणे म्हणजे संकटाला निमंत्रण देणे होय. त्यामुळे जपतलाईतील तीन मुलींचा मृत्यू हा केवळ सर्पदंशाचा परिणाम नसून प्रशासनाच्या दीर्घकाळ चाललेल्या बेफिकिरीचा परिणाम आहे. गरीब आणि आदिवासी पालक आपल्या मुलांना चांगले शिक्षण मिळावे म्हणून आश्रमशाळेत पाठवतात. त्यांच्या मुलांच्या सुरक्षिततेची जबाबदारी शासनाची आहे. त्यामुळे प्रत्येक आश्रमशाळेचे तातडीने सुरक्षा ऑडिट झाले पाहिजे.

खाटा, सुरक्षित निवास, स्वच्छता, वीज, खिडक्या, अग्निसुरक्षा, सर्पप्रतिबंधक उपाय आणि वैद्यकीय सुविधा यांची पूर्तता बंधनकारक केली पाहिजे. जपतलाई दुर्घटनेनंतर चौकशी, निलंबन आणि अहवाल यांची औपचारिकता होऊन प्रकरण संपता कामा नये. पुन्हा बैठक, पुन्हा आदेश आणि पुन्हा कागदोपत्री पाहणी अशी साखळी थांबली पाहिजे. आश्रमशाळेतील प्रत्येक लेकराला सुरक्षित छप्पर, सुरक्षित झोप आणि जगण्याची हमी मिळणे हा त्यांचा अधिकार आहे; सरकारने तो आता तरी कृतीतून सिद्ध करावा.

## ।। अभंगवाणी ।।



जया नाहीं नेम एकादशीव्रत ।
जाणावें तें प्रेत शव लोकीं ॥१॥

त्याचें वय नित्य काळ लेखीताहे ।
रागें दात खाय कराकरा ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# पंजाबच्या माजी उपमुख्यमंत्र्यांवर हल्ला

## दर्शनावरून परतत असताना हातावर वार, हल्लेखोर पोलिसांच्या ताब्यात

**महाईन्यूज । नांदेड**

**पंजाबचे माजी उपमुख्यमंत्री तथा अकाली दलाचे अध्यक्ष सुखबीरसिंग बादल यांच्यावर नांदेडमध्ये हल्ला करण्यात आला आहे. मातासाहिब गुरुद्वारामध्ये गुरुवारी दुपारी ही घटना घडली असून गुरुद्वारा दर्शन करून खाली येत असताना पायऱ्यांवर अज्ञात हल्लेखोराने धारदार शस्त्राने बादल यांच्या हातावर वार केला. यावेळी झालेल्या गोंधळानंतर संशयिताने अन्य एका पोलीस अधिकाऱ्यावर हल्ला केला. या घटनेत सुखवीरसिंग बादल यांच्यासह पोलीस अधिकारी जखमी झाले असून नांदेडच्या एका खाजगी रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. पोलिसांकडून हल्लेखोराला ताब्यात घेण्यात आल्याचं सांगितलं जात आहे.**



### आरोपीने काय म्हटले?

पोलिसांनी हल्लेखोर जसपास सिंगला ताब्यात घेतले असून त्यांची चौकशी केली. 'मला वाटले म्हणून मी त्यांच्यावर हल्ला केला', अशी एकच प्रतिक्रिया हल्लेखोर जसपाल सिंग यांनी दिली असल्याचे वृत्त न्यूज १८ ने दिले आहे. मात्र पोलिसांना हल्लेखोराचे विधान मोघम वाटत असून तो खरे कारण सांगत नसल्याचा संशय आहे. त्यामुळे पोलीस खऱ्या कारणाचा शोध घेत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, सुखबीरसिंग बादल पंजाब राज्याचे माजी उपमुख्यमंत्री तथा अकाली दलाचे प्रमुख आहेत. बुधवारी ते खासदार पत्नी हरसीमनकौर बादल आणि कुटुंबातील सदस्यासह सचखंड गुरुद्वारा दर्शनासाठी नांदेडला तीन दिवसाच्या दौऱ्यावर आले होते. गुरुद्वारामध्ये बादल कुटुंबीयाकडून पाठ ठेवण्यात आले होते. दरम्यान आज दुपारी २ वाजेच्या सुमारास सुखबीरसिंग बादल हे आपल्या कुटुंबियासह नांदेड शहरापासून जवळ असलेल्या माता साहेब गुरुद्वारा दर्शनासाठी गेले होते. यावेळी त्यांच्यासोबत पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात होता.

दर्शन करून खाली उतरत असताना पायरीवर एक वृद्ध व्यक्ती त्यांच्या जवळ आला. साधारण: ६० वर्ष वय असणारा हा व्यक्ती आपल्याशी आपल्याशी काहीतरी बोलण्याचा प्रयत्न करतोय, असं वाटल्याने सुखबीरसिंग बादल तिथे थांबले. मात्र सदर व्यक्तीने अचानक हल्ला करण्याचा प्रयत्न केला. खंजरने होणारा हा हल्ला रोखताना बादल यांच्या उजव्या हाताला जखम झाली आहे. बादल यांच्यावरील हल्ल्यानंतर हल्लेखोराने सुरक्षा दलातील पोलीस निरीक्षकावर देखील हल्ला केल्याची माहिती आहे.

दरम्यान, पंजाबचे माजी उपमुख्यमंत्री बादल यांच्यावर हल्ला झाल्याने खळबळ उडाली आहे. वृद्ध व्यक्तीने बादल यांच्यावर हल्ला का केला, या हल्ल्यामागील कारण काय होते, हे अद्याप स्पष्ट झालेलं नाही. हल्ल्यानंतर सुखबीरसिंग बदल यांना नांदेड येथील खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलं असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याचं सांगण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या घटनेच्या चौकशीचे आदेश दिले आहेत. त्यांनी बादल यांच्याशी संपर्क साधत त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. नांदेड पोलिसांना त्यांनी या घटनेमागील उद्देशाची सखोल चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत.

# सीएसएमटीवरून सुटणाऱ्या सर्व रेल्वेत 'जय भवानी, जय शिवाजी'चा नारा घुमणार?

**महाईन्यूज । मुंबई**

**मुंबईमधील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी) या रेल्वे स्थानकावरून दररोज शेकडो ट्रेन धावतात आणि हजारो प्रवासी प्रवास करतात. आता याच सीएसएमटी रेल्वे स्थानकावरून सुटणाऱ्या प्रत्येक रेल्वेत 'जय भवानी, जय शिवाजी' आणि 'छत्रपती शिवाजी महाराज की जय'चा नारा घुमण्याची शक्यता आहे. विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी या संदर्भात केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे मागणी केली आहे.**






सीएसएमटी रेल्वे स्थानकावर येणाऱ्या आणि जाणाऱ्या प्रत्येक रेल्वेमध्ये 'छत्रपती शिवाजी महाराज की जय' आणि 'जय भवानी, जय शिवाजी' अशा उद्घोषणा करण्यात याव्यात, अशी मागणी राहुल नार्वेकर यांनी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे केली आहे. या संदर्भात नार्वेकर यांनी मंत्री वैष्णव यांना एक पत्र देखील दिलं आहे.

"दिल्ली दौऱ्यादरम्यान केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेऊन छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (CSMT) येथून ये-जा करणाऱ्या प्रत्येक रेल्वेगाडीच्या उद्घोषणांमध्ये 'छत्रपती शिवाजी महाराज की जय' आणि 'जय भवानी, जय शिवाजी' या जयघोषांचा समावेश करण्यात यावा अशी मागणी पत्राद्वारे केली आहे", अशी माहिती राहुल नार्वेकर यांनी दिली आहे.

"सीएसएमटी (CSMT) हे केवळ मुंबईचे ऐतिहासिक रेल्वे स्थानक नसून छत्रपती शिवाजी महाराजांचे शौर्य, स्वराज्य, लोककल्याण आणि राष्ट्रहिताच्या विचारांचे प्रतीक आहे. देशाच्या विविध भागांतून दररोज हजारो प्रवासी या स्थानकावरून प्रवास करतात. त्यामुळे रेल्वेच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराजांच्या महान कार्याचा आणि स्वराज्याच्या विचारांचा संदेश देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचवण्याच्या दृष्टीने ही मागणी महत्त्वपूर्ण आहे", असं राहुल नार्वेकर यांनी म्हटलं आहे.

"केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी या मागणीचा सकारात्मक विचार करून संबंधित रेल्वे प्रशासनाला आवश्यक निर्देश द्यावेत, अशी विनंती केली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्याचा आणि स्वराज्याच्या विचारांचा जयघोष देशभर पोहोचवण्यासाठी हा उपक्रम निश्चितच प्रेरणादायी ठरेल असा मला विश्वास आहे", असंही राहुल नार्वेकर यांनी सोशल मीडियावरील पोस्टमध्ये म्हटलं आहे.

# IRGC चा अमेरिकेविरुद्ध मास्टर प्लॅन

## युद्धात माघार न घेण्याचे स्पष्ट संकेत; ट्रम्प यांच्या कार्यकाळावर मोठं भाष्य

**महाईन्यूज । अमेरिका**

**अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा कार्यकाळ संपेपर्यंत इराण जाणीवपूर्वक युद्ध लांबवू शकते, असा दावा इराणच्या इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड कॉर्प्सचे वरिष्ठ सल्लागार मोहम्मद रझा नक्वी यांनी केला आहे. अमेरिकेचे आर्थिक व लष्करी नुकसान करून भविष्यातील संभाव्य हल्ल्यांना आळा घालणे किंवा धाक निर्माण करणे हा या धोरणाचा मुख्य उद्देश असल्याचे नक्वींनी स्पष्ट केले.**





रझा नक्वी यांनी 'पीबीएस न्यूजआवर' या वृत्तवाहिनीला एक मुलाखत दिली आहे. "या युद्धाचा कालावधी अमेरिकेच्या पुढील अध्यक्षीय निवडणुकीपर्यंत वाढवणे आणि त्यांच्या संसाधनांचे नुकसान करणे हा एक मार्ग आहे. यामुळे यापुढे इराणवर हल्ला करू इच्छिणाऱ्या कोणत्याही देशाला याची मोठी किंमत मोजावी लागेल, याची जाणीव होईल," असे नक्वी म्हणाले. सध्या युद्धात इराण आघाडीवर आहे, मात्र अद्याप अंतिम ध्येय साध्य झालेले नाही, असे प्रतिपादन नक्वी यांनी केले.

"युद्ध प्रदीर्घ काळ चालल्यास इराणला अमेरिकेविरोधात लढण्याचा अधिक अनुभव मिळेल आणि यामुळे अमेरिकेला मोठा आर्थिक व लष्करी फटका बसेल", असा विश्वास नक्वी यांनी व्यक्त केला. या मुलाखतीदरम्यान नक्वी यांनी इराणच्या क्षेपणास्त्र क्षमतेबद्दलही भाष्य केले. "इराण रोज जेवढ्या क्षेपणास्त्रांचा वापर करत आहे, त्याहून अधिक क्षेपणास्त्रांचे उत्पादन देशात सुरू आहे. युद्ध वर्षानुवर्षे चालले तरी इराण वेगवेगळ्या ठिकाणांहून क्षेपणास्त्र निर्मिती आणि हल्ले सुरू ठेवू शकतो", असे नक्वी म्हणाले.

क्षेपणास्त्रांचा साठा संपला तरी इराण धोकादायक ठरू शकतो, असा सूचक इशारा त्यांनी दिला. "जगात सर्वत्र अमेरिकेचे अनेक आर्थिक हितसंबंध आहेत आणि ते सर्व सहज उद्ध्वस्त केले जाऊ शकतात," असे स्पष्टीकरण नक्वींनी या इशाऱ्याबाबत दिले. दरम्यान, कोणत्या विशिष्ट आर्थिक घटकांना लक्ष्य केले जाईल? किंवा हे हल्ले कसे केले जातील? याचा सविस्तर खुलासा केला नाही.

# आरजी कर हॉस्पिटलमधील बलात्कार प्रकरणात २ वर्षांनंतर मोठी कारवाई!

**महाईन्यूज । कोलकाता**

**कोलकाता येथील आर.जी.कर वैद्यकीय महाविद्यालय आणि हॉस्पिटलमध्ये ऑगस्ट २०२४ मध्ये एका महिला प्रशिक्षणार्थी डॉक्टरवर बलात्कार करून तिची हत्या करण्यात आल्याची घटना घडली होती. या घटनेनंतर देशभरात मोठी खळबळ उडाली होती. या प्रकरणातील आरोपी संजय रॉयला न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा ठोठावली आहे. या प्रकरणात आता दोन वर्षांनंतर आणखी एक मोठी कारवाई करण्यात आली आहे.**




आर.जी.कर वैद्यकीय महाविद्यालय आणि हॉस्पिटलमध्ये घडलेल्या या घटनेनंतर डॉक्टरच्या मृतदेहावर कथितरीत्या घाईघाईने अंत्यसंस्कार केल्याप्रकरणी तृणमूल कॉँग्रेसचे माजी आमदार निर्मल घोष यांना गुरुवारी अटक करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. मृत डॉक्टरच्या वडिलांनी या संदर्भात तक्रार दाखल केली होती, त्यानंतर ही कारवाई करण्यात आली आहे.

पीडित डॉक्टरच्या स्मरणार्थ आयोजित एका कार्यक्रमात उपस्थित असताना मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी यांनी पोलीस आयुक्तांना या कथित घाईघाईने केलेल्या अंत्यसंस्काराच्या आरोपांची चौकशी करण्याचे निर्देश दिले होते. तसेच दुसऱ्या शवविच्छेदनाची शक्यता टाळण्यासाठी आणि पुरावे नष्ट करण्याच्या उद्देशाने घाईने अंत्यसंस्कार करण्यात आल्याचा आरोप पीडितेच्या वडिलांनी केला होता.

दरम्यान, एका वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने सांगितलं की, हा गुन्हा बलात्कार आणि हत्येप्रकरणी सुरू असलेल्या सीबीआयच्या तपासापेक्षा वेगळा आहे. सीबीआय आर.जी.कर हॉस्पिटलमधील बलात्कार आणि हत्या प्रकरणाचा तपास करत आहे. जे कोलकाता पोलिसांच्या अधिकार क्षेत्रात येतं. मात्र, खारदाह पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आलेला नवीन एफआयआर हा मृत व्यक्तीच्या कुटुंबीयांच्या तक्रारींवर आधारित आहे. कुटुंबीयांचा आरोप आहे की पुरावे दडपण्यासाठी त्यांच्या संमतीशिवाय मृतदेहावर घाईघाईने अंत्यसंस्कार करण्यात आले, अशी माहिती या अधिकाऱ्याने पीटीआयशी बोलताना दिल्याचं वृत्तात म्हटलं आहे.

### नेमकं घटना काय घडली होती?

९ ऑगस्ट २०२४ रोजी कोलकाता येथील आर.जी.कर वैद्यकीय महाविद्यालयाच्या सेमिनार हॉलमध्ये एका कनिष्ठ महिला डॉक्टरचा मृतदेह आढळून आला होता. तिच्यावर बलात्कार करून तिची अत्यंत निर्घृण हत्या करण्यात आली होती. या घटनेनंतर संपूर्ण देशात संतापाची लाट उसळली होती आणि न्यायासाठी देशभरात तीव्र निदर्शने झाली होती. या प्रकरणात सुरुवातीला कोलकाता पोलिसांनी संजय रॉय याला अटक केली होती. मात्र, पोलिसांच्या तपासावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाल्याने नंतर हा तपास केंद्रीय अन्वेषण विभागाकडे (CBI) सोपवण्यात आला होता. २० जानेवारी २०२५ रोजी विशेष न्यायालयाने संजय रॉय याला दोषी ठरवत जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. या बलात्कार आणि हत्येच्या घटनेनेनंतर संपूर्ण देश हादरून गेला होता. तसेच देशभरातून याचा निषेध करण्यात आला होता. इतकेच नाही तर देशभरातील डॉक्टर हे त्यांच्या सुरक्षेच्या मुद्द्यावर आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले होते.



# नेहाचा ग्लॅमरस लूक

नेहा पेंडसे ही मराठी मनोरंजन विश्वासह हिंदी आणि दक्षिण भारतीय सिनेसृष्टीतील एक लोकप्रिय अभिनेत्री व चित्रपट निर्माती आहे. नेहाने मराठी, हिंदी, तमिळ, तेलुगू आणि मल्याळम चित्रपट तसेच लोकप्रिय मालिकांमध्ये आपल्या अभिनयाचा ठसा उमटवला आहे. काही दिवसांपूर्वीच नेहाची मुख्य भूमिका असलेला आणि जिजीविषा काळे दिग्दर्शित 'तिघी' हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीस आला होता. या चित्रपटात नेहासह भारती आचरेकर, सोनाली कुलकर्णी, निपुण धर्माधिकारी, पुष्कराज चिरपुटकर, सुव्रत जोशी आणि संजय मोने यांसारख्या दिग्गज कलाकारांच्या महत्त्वाच्या भूमिका आहेत. नुकतेच नेहाने केलेले एक नवं फोटोशूट सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहे. या फोटोंमध्ये नेहाने सुंदर अशा गुलाबी रंगाचा प्लेन गाऊन परिधान केला असून तिचा हा लूक चाहत्यांच्या पसंतीस उतरत आहे. अत्यंत लहान वयातच बालकलाकार म्हणून नेहाने आपल्या अभिनय प्रवासाला सुरुवात केली होती.



# तमन्नाच्या 'रागिनी 3'ची शूटिंग सुरू

प्रसिद्ध दिग्दर्शक शशांत घोष सध्या 'रागिनी 3' हा चित्रपट दिग्दर्शित करत आहेत. या चित्रपटात तमन्ना भाटिया मुख्य भूमिकेत दिसून येणार आहे. अलिकडेच तमन्नाने या चित्रपटाच्या चित्रिकरणाचे एक छायाचित्र शेअर करत चाहत्यांची उत्सुकता आणखी वाढविली आहे. तमन्नाने 'रागिनी 3'च्या क्लॅप बोर्डासोबत एक खास छायाचित्र इन्स्टाग्राम स्टोरीवर शेअर केली आहे. या चित्रपटाचे चित्रिकरण 15 जुलैपासून सुरू झाले आहे. शशांक घोष यांनी यापूर्वी 'वीरे दी वेडिंग', 'खुबसुरत' यासारख्या गाजलेल्या चित्रपटांसोबत 'फ्रेडी' आणि 'क्विक गन मुरुगन' यासारखे चित्रपट दिले आहेत. तर रागिनी 3 या चित्रपटाची निर्मिती एकता कपूर करत आहे. आतापर्यंत एकता कपूरचा चित्रपट 'रागिनी'चे दोन भाग प्रदर्शित झाले आहेत. आता एकता या फ्रेंचाइजीचा तिसरा चित्रपट घेऊन येत आहे. रागिनी 3 हा आगामी बॉलिवूड हॉरर-थ्रिलरपट आहे. तमन्ना भाटियासोबत या चित्रपटात जुनैद खान, नर्गिस फाकरी आणि आयुष शर्मा मुख्य भूमिकांमध्ये दिसून येऊ शकतात.

# भाभीजीचा घटस्फोट..

भाभीजी घर पर हैं! या लोकप्रिय मालिकेच्या माध्यमातून घराघरात पोहोचलेली अभिनेत्री शुभांगी अत्रे सध्या तिच्या वैवाहिक आयुष्यामुळे पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. शुभांगी आणि तिचा पती पीयूष पुरे यांनी लग्नाच्या तब्बल १९ वर्षांनंतर एकमेकांपासून वेगळे होण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या या निर्णयाने चाहत्यांना धक्का बसला होता. आता लग्नाच्या इतक्या वर्षांनंतर घटस्फोट घेण्यामागे नक्की काय कारण होते, याचा खुलासा स्वतः शुभांगीने माध्यमाशी बोलताना मुलाखतीत केला आहे.शुभांगीने तिच्या वैवाहिक आयुष्यातील अनेक न सांगितलेल्या गोष्टींवर मोकळेपणाने भाष्य केले. शुभांगी आणि पीयूष यांचे २००३ मध्ये लग्न झाले होते. ज्यावेळी त्यांचे लग्न झाले, त्यावेळी शुभांगी अवघ्या २२ वर्षांची होती. कॉलेजच्या दिवसांत इंदूरमध्ये त्यांची पहिली भेट झाली होती. तिच्या कुटुंबाची इच्छा होती की तिने दुसऱ्या एखाद्या मुलाशी विवाह करावा. परंतु, ती पीयूषच्या प्रेमात पूर्णपणे पडली असल्याने तिने आधीच त्याच्याशीच लग्न करण्याचा ठाम निर्णय घेतला होता. कुटुंबियांचा विरोध पत्करून किंवा त्यांना राजी करून तिने पीयूषसोबत संसार थाटला. मात्र, लग्नानंतर काही वर्षांनी त्यांच्या नात्यात हळूहळू बदल होऊ लागले. शुभांगीने दिलेल्या माहितीनुसार, काळाच्या ओघात तिच्या नवऱ्याचे दारूचे व्यसन खूप वाढले होते. या व्यसनामुळे त्याच्या स्वभावातही मोठा बदल झाला आणि तो अत्यंत चिडचिडा बनला होता. घरातील वातावरण आणि नात्यातील तणाव दिवसांदिवस वाढत गेला. दारूच्या व्यसनामुळे आणि बदललेल्या स्वभावामुळे त्यांच्यात सतत वाद होऊ लागले., रोजच्या या त्रासाला आणि मानसिक तणावाला कंटाळून त्यांनी वेगळे होण्याचा मार्ग निवडला. १९ वर्षांचा प्रदीर्घ संसार वाचवण्याचा प्रयत्न केल्यानंतरही परिस्थिती न सुधारल्याने अखेर त्यांनी घटस्फोटाचा कठीण निर्णय घेतला.





# रोनाल्डो-जॉर्जिना अखेर विवाहबद्ध

## 10 वर्षांच्या नात्यानंतर कॅस्केस येथे दोघांचा विवाह; लग्नात 5 मुलंही उपस्थिती

**महाईन्यूज । पोर्तुगाल**

**फुटबॉल विश्वातील सुपरस्टार क्रिस्टियानो रोनाल्डो आणि त्याची साथीदार जॉर्जिना रॉड्रिग्ज अखेर विवाहबद्ध झाले आहेत. 11 ऑगस्ट 2026 रोजी पोर्तुगालमधील कॅस्केस येथे दोघांनी विवाह केला. लग्नानंतर दोघांनी सोशल मीडियावर एकत्र फोटो शेअर करत ही आनंदाची बातमी चाहत्यांना दिली.**



रोनाल्डो आणि जॉर्जिनाने लग्नाचा सोहळा अतिशय खासगी ठेवला होता. या सोहळ्यात त्यांच्या कुटुंबातील जवळचे सदस्य आणि रोनाल्डोची पाच मुले सहभागी झाली होती. लग्नानंतर शेअर केलेल्या फोटोमध्ये दोघांच्या हातातील लग्नाच्या अंगठ्या दिसत आहेत. फोटोसोबत त्यांनी "C G" असे कॅप्शन दिले आहे.

रोनाल्डो आणि जॉर्जिनाची पहिली भेट 2016 मध्ये झाली होती. त्यावेळी जॉर्जिना माद्रिदमधील Gucciच्या स्टोअरमध्ये काम करत होती. त्यानंतर दोघांच्या नात्याला सुरुवात झाली आणि पुढील अनेक वर्षे ते एकत्र होते. 2025 मध्ये जॉर्जिनाने सोशल मीडियावर साखरपुड्याची घोषणा केली होती. जॉर्जिनाने यापूर्वी त्यांच्या पहिल्या भेटीबद्दल बोलताना ती भेट 'पहिल्या नजरेतील प्रेम' असल्याचं म्हटलं होतं. रोनाल्डो आणि जॉर्जिना अनेक वर्षांपासून एकत्र राहत असून त्यांच्या नात्याची चर्चा होत होती.

रोनाल्डो आणि जॉर्जिना यांच्या कुटुंबात पाच मुले आहेत. त्यांच्यात अलाना आणि बेला या मुलींचा समावेश आहे. रोनाल्डोचा मोठा मुलगा क्रिस्टियानो ज्युनियर आणि जुळी मुले ईव्हा मारिया आणि माटेओ यांचाही जॉर्जिनाच्या कुटुंबात समावेश आहे.

2022 मध्ये या कुटुंबावर मोठं दुःख कोसळलं होतं. रोनाल्डो आणि जॉर्जिनाने जुळ्या मुलांची अपेक्षा केली होती; मात्र त्यांच्या मुलाचा जन्मावेळी मृत्यू झाला. त्यांची मुलगी बेला सुरक्षित राहिली. रोनाल्डो लग्न करणार असल्याची चर्चा काही दिवसांपासून सुरु होती.

अखेर दोघांनी सोशल मीडियावरील पोस्टद्वारे लग्नाची अधिकृत माहिती दिली आणि चाहत्यांनाही सुखद धक्का दिला. जवळपास दशकभराच्या नात्यानंतर रोनाल्डो आणि जॉर्जिनाने विवाह केला आहे. त्यामुळे त्यांच्या लग्नाचा फोटो सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात चर्चेचा विषय ठरला आहे. रोनाल्डोची जनसंपर्क यंत्रणा सांभाळणाऱ्या 'ब्रंसविक ग्रुप'ने दिलेल्या माहितीनुसार, हा सोहळा अत्यंत खाजगी आणि कौटुंबिक वातावरणात पार पडला. या विवाह सोहळ्याला रोनाल्डो आणि जॉर्जिनाची पाचही मुले उपस्थित होती.

### कौटुंबिक वातावरणात पार पडला विवाह सोहळा

या दोघांची प्रेम कहाणी २०१६ मध्ये माद्रिद येथे सुरू झाली होती, जेव्हा जॉर्जिना 'गुची'च्या एका स्टोअरमध्ये काम करत होती. त्यानंतर जानेवारी २०१७ मध्ये झुरिच येथील 'बेस्ट फिफा फुटबॉल अवॉर्ड्स'दरम्यान हे जोडपे पहिल्यांदाच जाहीरपणे एकत्र दिसले. हळूहळू या प्रेमाचे रूपांतर जगातील सर्वात चर्चेत असलेल्या सेलिब्रिटी कपल्समध्ये झाले. नेटफ्लिक्सवरील 'आय एम जॉर्जिना' (I AM GEORGINA) या वेब सीरिजमध्येही त्यांच्या या प्रेमप्रकरणाचे आणि कौटुंबिक आयुष्याचे सुंदर पैलू जगभरातील प्रेक्षकांनी पाहिले आहेत. या सीरिजमध्ये बोलताना रोनाल्डोने कबूल केले होते की, सुरुवातीला हे नाते इतके घट्ट होईल असा अंदाज त्याला नव्हता; परंतु काळाच्या ओघात जॉर्जिना त्याच्या आयुष्यातील सर्वात खास व्यक्ती बनली.

# वडिलांच्या निधनानंतर लिओनेल मेस्सीचा फुटबॉलमधून 'ब्रेक'

**महाईन्यूज । अर्जेंटिना**

**वडिलांच्या निधनानंतर अर्जेंटिनाचा दिग्गज फुटबॉलपटू लिओनेल मेस्सीने फुटबॉलमधून अनिश्चित काळासाठी ब्रेक घेतला आहे. स्पॅनिश वृत्तपत्र 'मार्का'ने (Marca) दिलेल्या वृत्तानुसार, शुक्रवारी वडील हॉर्हे मेस्सी (Jorge Messi) यांचे निधन झाल्यानंतर मेस्सी त्यांच्या अंत्यसंस्कारासाठी या आठवड्यात अर्जेंटिनाला रवाना झाला आहे.**



विश्वचषक विजेत्या मेस्सीसाठी वडील हॉर्हे यांचे निधन हा अत्यंत मोठा वैयक्तिक धक्का आहे. हॉर्हे मेस्सी हे केवळ लिओनेलचे वडील नव्हते, तर त्याच्या संपूर्ण फुटबॉल कारकिर्दीचे मुख्य शिल्पकार होते. एका स्टील कारखान्यात सुपरवायझर म्हणून काम करणाऱ्या हॉर्हे यांनी मेस्सीच्या बालपणापासून ते जागतिक फुटबॉलच्या शिखरावर पोहोचेपर्यंत त्याचे मुख्य मॅनेजर, प्रतिनिधी आणि सल्लागार म्हणून महत्त्वाची भूमिका बजावली होती. मेस्सी नुकताच दुखापतीतून सावरून सर्वोत्तम फॉर्ममध्ये परतला होता. 'लीग्स कप'मध्ये ॲटलेटिको सॅन लुईस विरुद्धच्या सामन्यात त्याने दोन गोल करत चमकदार कामगिरी केली होती; मात्र आता त्याच्या क्रीडा कारकिर्दीतील सर्व महत्त्वाच्या गोष्टींना पूर्णविराम मिळाला आहे.

लहानपणी मेस्सीला ग्रोथ हार्मोनच्या कमतरतेचा आजार होता. याचा त्याच्या शारीरिक वाढीवर परिणाम होत होता. बार्सिलोना क्लबने या उपचारांचा खर्च उचलला. दररोज इंजेक्शन घ्यावे लागणाऱ्या या कठीण उपचारांमधून जात मेस्सीने १.७० मीटर उंची गाठली आणि जगातील महान खेळाडू बनला. या संपूर्ण प्रवासात हॉर्हे यांनी त्याला मोलाची साथ दिली. २०२३ मध्ये 'इंटर मियामी'मध्ये समाविष्ट झाल्यापासून मेस्सीने 'मेजर लीग सॉकर' (MLS), 'कॉनकॅफ' आणि इतर स्पर्धा मिळून १०७ सामन्यांमध्ये ९२ गोल केले आहेत.

### 'इंटर मियामी'मध्ये परतण्याची तारीख अनिश्चित

इंटर मियामीचा (INTER MIAMI) कर्णधार असलेल्या मेस्सीच्या अमेरिकेत परतण्याबाबत कोणतीही निश्चित वेळ किंवा तारीख अद्याप ठरलेली नाही. 'लीग्स कप'मधील मोंटेरीविरुद्धच्या (MONTERREY) सामन्याची तयारी करत असताना मेस्सीला दक्षिण फ्लोरिडामध्ये असताना वडिलांच्या निधनाची दुःखद बातमी मिळाली. ६८ वर्षीय हॉर्हे मेस्सी यांचे रोझारियो येथील हॉस्पिटलमध्ये निधन झाले. मेस्सीसाठी हा अत्यंत मोठा वैयक्तिक धक्का मानला जात आहे. अर्जेंटिनामधील माध्यमांच्या हवाल्याने दिलेल्या वृत्तानुसार, मेस्सीने या कठीण काळात कुटुंबासोबत राहण्यासाठी आपल्या सर्व व्यावसायिक कमिटमेंट्स थांबवल्या आहेत. सध्याच्या त्याच्या 'इंटर मियामी' (INTER MIAMI) क्लबमध्ये तो कधी परतणार, याची कोणतीही तारीख निश्चित करण्यात आलेली नाही. इंटर मियामी क्लबने मेस्सीला पूर्ण पाठिंबा दर्शवत अनिश्चित काळाची सुट्टी मंजूर केली आहे. मेस्सीला जितका वेळ कुटुंबासोबत घालवणे आवश्यक वाटेल, तितका वेळ तो अर्जेंटिनामध्ये राहू शकतो, असे क्लब व्यवस्थापनाने स्पष्ट केले आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY

महाईन्यूज™

epaper.mahaenews.com

ePaper

। शुक्रवार ।

दि. 14 ऑगस्ट 2026 ।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# 'नाशिक फाटा-खेड एलिव्हेटेड कॉरिडॉर'साठी भूसंपादन 'मार्किंग' सुरू!



## पिंपरी-चिंचवडसह चाकणच्या औद्योगिक विकासाला मिळणार नवी चालना




## भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या पाठपुराव्याला प्रशासनाचे बळ

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवडसह चाकण आणि खेडच्या औद्योगिक पट्ट्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या नाशिक फाटा–खेड एलिव्हेटेड कॉरिडॉरच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीला आता गती मिळाली आहे. या प्रकल्पासाठी नगरविकास विभागाकडून आज मार्गाचे मार्किंग सुरू झाले असून, भूसंपादन प्रक्रियेलाही वेग आला आहे. या पार्श्वभूमीवर प्रकल्पासाठी सातत्याने पाठपुरावा भाजपाचे आमदार महेश लांडगे यांच्या प्रयत्नांना बळ मिळाले आहे.**

नाशिक फाटा–खेड एलिव्हेटेड कॉरिडॉर हा केवळ वाहतूक कोंडी सोडविणारा प्रकल्प नसून पुणे–पिंपरी-चिंचवड–चाकण–खेड या संपूर्ण औद्योगिक पट्ट्याच्या विकासाला गती देणारी महत्त्वाची पायाभूत सुविधा आहे. या मार्गामुळे नाशिक फाटा, भोसरी, मोशी, चाकण आणि खेड परिसरातील वाढत्या वाहतुकीचा ताण कमी करण्यास मदत होणार आहे.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला मंजुरी दिल्यानंतर त्याची अंमलबजावणी वेगाने व्हावी, यासाठी आमदार महेश लांडगे यांनी सातत्याने पाठपुरावा केला. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली प्रकल्पाचे भूसंपादन पूर्ण करून प्रत्यक्ष कामाला सुरुवात व्हावी, यासाठी संबंधित यंत्रणांशी समन्वय साधत प्रकल्पाला गती देण्याची भूमिका त्यांनी घेतली. तसेच, विधानसभा अधिवेशनातही हा मुद्दा सातत्याने लावून धरला आहे.

आता नगरविकास विभागाकडून मार्गाचे मार्किंग सुरू झाल्याने आणि भूसंपादन प्रक्रियेला वेग मिळाल्याने लांडगे यांच्या पाठपुराव्याला प्रत्यक्ष प्रशासकीय गती मिळाल्याचे चित्र आहे. चाकण औद्योगिक पट्ट्यात ऑटोमोबाईल, इंजिनिअरिंग, उत्पादन आणि लॉजिस्टिक्स



> "नाशिक फाटा–खेड एलिव्हेटेड कॉरिडॉर हा केवळ वाहतूक कोंडी सोडविणारा प्रकल्प नाही, तर पिंपरी-चिंचवड, चाकण आणि खेडच्या औद्योगिक विकासाला नवी गती देणारा महत्त्वाचा वाहतूक-कणा आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी या प्रकल्पाला मंजुरी दिल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली प्रकल्पाचे भूसंपादन आणि प्रत्यक्ष कामाला सुरुवात व्हावी, यासाठी आम्ही सातत्याने पाठपुरावा करत आहोत. आज नगरविकास विभागाकडून मार्किंग सुरू झाले असून भूसंपादन प्रक्रियेलाही गती मिळाली आहे. हा प्रकल्प लवकरात लवकर प्रत्यक्षात यावा आणि पुणे महानगर प्रदेशाच्या विकासाला नवी दिशा मिळावी, यासाठी आमचा पाठपुरावा यापुढेही कायम राहील."
>
> **- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

क्षेत्रातील मोठ्या उद्योगांची संख्या आहे.

मात्र, वाढती वाहतूक कोंडी आणि अपुरी रस्ते क्षमता यामुळे उद्योगांच्या वाहतूक व्यवस्थेवर मोठा परिणाम होत आहे. एलिव्हेटेड कॉरिडॉरमुळे लांब पल्ल्याची वाहतूक अधिक वेगाने पुढे जाण्यास मदत होणार असून, उद्योगांसाठी वेळ, इंधन आणि लॉजिस्टिक्स खर्चात बचत होण्याची शक्यता आहे. त्यामुळे चाकणच्या औद्योगिक विकासासाठी हा प्रकल्प 'गेमचेंजर' ठरणार असल्याचे लांडगे यांनी अधोरेखित केले आहे.



### आर्थिक कॉरिडॉरला नवी ताकद

नाशिक फाटा–खेड मार्गामुळे केवळ पिंपरी-चिंचवडची वाहतूक कोंडी कमी होणार नाही, तर पुणे–नाशिक आर्थिक पट्ट्याची वाहतूक क्षमता वाढणार आहे. नवीन उद्योग, लॉजिस्टिक्स पार्क, वेअरहाऊसिंग आणि रोजगारनिर्मितीसाठी आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण करण्याच्या दृष्टीने हा प्रकल्प महत्त्वाचा आहे. "हा केवळ फ्लायओव्हर नाही, तर पिंपरी-चिंचवडपासून चाकण-खेडपर्यंतच्या औद्योगिक विकासाचा वाहतूक-कणा आहे. मार्किंग सुरू होणे आणि भूसंपादनाला गती मिळणे हे प्रकल्पाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल आहे. पुढील टप्प्यात भूसंपादन प्रक्रिया पूर्ण करून प्रत्यक्ष बांधकामाला गती मिळावी, यासाठीही आपला पाठपुरावा सुरूच राहणार असल्याचे आमदार महेश लांडगे यांनी स्पष्ट केले.

# पिंपळे सौदागरच्या कियांशची 'गिनीज'मध्ये नोंद!

## संस्कृत श्लोक पठणात रचला इतिहास; पूज्य कोठारी स्वामींच्या हस्ते सन्मान






**महाईन्यूज ।**
पिंपरी- चिंचवड

**भारताच्या प्राचीन संस्कृतीचा आणि आर्ष अध्यात्माचा वारसा बालवयातच जोपासत पिंपळे सौदागर येथील चिमुकल्या कु.कियांश शर्मा (सुपुत्र: श्री.प्रज्ञेश व सौ.रेना शर्मा) याने थेट 'गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड' (GUINNESS WORLD RECORDS) च्या जागतिक मंचावर भारताचा तिरंगा फडकावला आहे.**

संस्कृत श्लोकांच्या अमोघ पठणाने जागतिक विक्रमाची नोंद करणाऱ्या कियांशला अधिकृत गिनीज प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले असून, त्याच्या या अलौकिक यशामुळे संपूर्ण पिंपरी- चिंचवड शहराची मान अभिमानाने उंचावली आहे.

भाजप पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष तथा नगरसेवक श्री.शत्रुघ्न (बापू) काटे यांनी कु.कियांश शर्मा याचे विशेष कौतुक करत त्याच्या या ऐतिहासिक कामगिरीबद्दल शर्मा कुटुंबाचे अभिनंदन केले व बालकाच्या उज्ज्वल भविष्यासाठी उदंड शुभेच्छा दिल्या.

कु.कियांश शर्माच्या या अलौकिक यशामुळे पिंपळे सौदागर परिसरात उत्साहाचे वातावरण असून, सर्वच स्तरातून या चिमुकल्या बालकावर आणि शर्मा कुटुंबावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

### वडोदरा येथील सोहळ्यात संस्कृत श्लोकांचा गजर

२ फेब्रुवारी २०२६ रोजी वडोदरा येथे आयोजित ऐतिहासिक 'सत्संग दीक्षा फिनाले' दरम्यान भव्य 'संस्कृत श्लोक पठण' उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यात कियांशने अत्यंत प्रगल्भ पाठांतर, शुद्ध उच्चारण आणि अढळ शिस्तीच्या जोरावर श्लोक पठण करत या जागतिक विक्रमात आपले नाव सुवर्ण अक्षरांनी कोरले. त्याच्या या अद्भुत यशाची दखल घेत ८ ऑगस्ट २०२६ रोजी आयोजित विशेष भव्य सत्कार समारंभात पूज्य कोठारी स्वामी (पू. कोठारी बापा) यांच्या शुभहस्ते कियांशला 'गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड'चे अधिकृत प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.


### भारतीय संस्कृतीचे जतन करणारा बालतारा

कियांशच्या यशावर आनंद व्यक्त करताना भाजप शहराध्यक्ष श्री. शत्रुघ्न (बापू) काटे म्हणाले, "आजच्या आधुनिक आणि डिजिटल युगात एवढ्या लहान वयात पाश्चात्य संस्कृतीच्या प्रभावापासून दूर राहून, आपल्या संस्कृत भाषेचा आणि आध्यात्मिक मूल्यांचा वारसा जपणे ही अत्यंत दुर्मिळ व कौतुकास्पद बाब आहे. कियांशने मिळवलेले हे 'गिनीज रेकॉर्ड' केवळ त्याच्या कुटुंबाचाच नाही, तर संपूर्ण पिंपळे सौदागर आणि पिंपरी-चिंचवड शहराचा गौरव आहे. त्याची ही निष्ठा आणि साधना आजच्या पिढीतील इतर बालकांसाठी नक्कीच प्रेरणादायी ठरेल."

# भटक्या कुत्र्यांच्या समस्येवर तातडीने उपाययोजना करा : श्रीनिवास बिरादार

**महाईन्यूज ।** पिंपरी- चिंचवड





प्रति,
मा. आयुक्त साहेब,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,

विषय : पिंपरी चिंचवड शहरातील वाढत्या भटक्या कुत्र्यांच्या समस्येबाबत तात्काळ उपाययोजना करून नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी कार्यवाही करण्याबाबत.

महोदय,

पिंपरी चिंचवड शहरामध्ये गेल्या काही वर्षांपासून भटक्या कुत्र्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत असून, त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. शहरातील विविध भागांमध्ये लहान मुले, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच दुचाकीस्वारांवर भटक्या कुत्र्यांकडून हल्ल्याच्या घटना सातत्याने घडत आहेत. नुकतीच म्हेत्रे वस्ती परिसरात चार वर्षीय चिमुरडीवर सात भटक्या कुत्र्यांच्या टोळीने जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली असून, या घटनेचे सीसीटीव्ही फुटेजही समोर आले आहे. या घटनेमुळे संपूर्ण शहरातील नागरिकांमध्ये भीती आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे संपूर्ण पिंपरी चिंचवड शहरात भटक्या कुत्र्यांची वाढती संख्या, आक्रमक कुत्र्यांचा वावर तसेच नागरिकांवरील वाढते हल्ले लक्षात घेता, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देणे अत्यंत आवश्यक आहे.त्यामुळे भटक्या कुत्र्यांच्या समस्येबाबत तात्काळ उपाययोजना करण्यात यावी अशी मागणी आम्ही करीत आहोत.

पिंपरी चिंचवड शहरातील भटक्या कुत्र्यांच्या समस्येबाबत तात्काळ योग्य उपाययोजना करून कार्यवाही करण्यात यावी. विशेषतः आक्रमक व धोकादायक भटक्या कुत्र्यांचा नियमानुसार बंदोबस्त करणे, कुत्र्यांची नसबंदी व लसीकरण मोहीम प्रभावीपणे राबविणे, नागरिकांच्या तक्रारींवर त्वरित कार्यवाही करणे तसेच नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना तातडीने करण्यात याव्यात. नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण होणार नाही यासाठी या विषयावर तातडीने निर्णय घेऊन प्रभावी कार्यवाही करावी,

ही विनंती.

लिपीक,
आयुक्त कक्ष
पिंपरी चिंचवड म.न.पा

आपला विश्वासु
श्रीनिवास तानाजी बिरादार
9527729008

**शहरातील वाढती भटक्या कुत्र्यांची संख्या आणि नागरिकांवरील हल्ल्यांच्या वाढत्या घटनांमुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे. या पार्श्वभूमीवर भटक्या कुत्र्यांच्या समस्येवर तातडीने प्रभावी उपाययोजना करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते श्रीनिवास बिरादार यांनी पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्तांकडे पत्राद्वारे केली आहे.**

शहरातील विविध भागांमध्ये लहान मुले, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच दुचाकीस्वारांवर भटक्या कुत्र्यांकडून हल्ले होण्याच्या घटना सातत्याने घडत आहेत. नुकतीच म्हेत्रे वस्ती परिसरात चार वर्षीय चिमुरडीवर सात भटक्या कुत्र्यांच्या टोळीने केलेल्या जीवघेण्या हल्ल्याची घटना समोर आली. या घटनेचे सीसीटीव्ही फुटेजही समोर आल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

या पार्श्वभूमीवर महापालिका प्रशासनाने शहरातील भटक्या कुत्र्यांची वाढती संख्या, आक्रमक कुत्र्यांचा वावर आणि नागरिकांवरील हल्ल्यांच्या घटनांकडे गांभीर्याने पाहण्याची गरज असल्याचे बिरादार यांनी पत्रात नमूद केले आहे. आक्रमक व धोकादायक भटक्या कुत्र्यांचा नियमानुसार बंदोबस्त करावा, कुत्र्यांची नसबंदी व लसीकरण मोहीम प्रभावीपणे राबवावी, नागरिकांच्या तक्रारींवर तातडीने कार्यवाही करावी, तसेच नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक त्या उपाययोजना त्वरित करण्यात याव्यात, अशी मागणी त्यांनी केली आहे.

नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण होणार नाही, यासाठी महापालिका प्रशासनाने या विषयावर तातडीने निर्णय घेऊन प्रभावी कार्यवाही करावी. भटक्या कुत्र्यांच्या समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना करून नागरिकांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करून द्यावे, अशी अपेक्षाही श्रीनिवास बिरादार यांनी व्यक्त केली आहे.

# Fathers' Day Celebration at Preschool section of Priyadarshani School Moshi

**MahaEnews** | PIMPRI-CHINCHWAD

**Priyadarshani School Moshi celebrated Father's Day with great enthusiasm, warmth and sporting spirit for the students of the Preschool Section. The celebration beautifully highlighted the special bond between fathers and their little ones, making the day memorable for every family.**



The highlight of the event was an exciting football match played exclusively between the parents, which filled the school playground with energy, cheers and laughter.

Fathers enthusiastically stepped onto the field, displaying remarkable sportsmanship, teamwork and a youthful competitive spirit.

Their little champions watched with immense excitement, cheering for their favourite teams from the sidelines.

The event provided a wonderful opportunity for fathers to play, connect and create cherished memories with their children.

The atmosphere was filled with joy as families came together to celebrate the invaluable role of fathers in a child's life.

The celebration also promoted the values of fitness, teamwork, togetherness and healthy competition among the school community.

The enthusiastic participation of parents added a special charm and vibrancy to the occasion.

Through this unique celebration, the school reinforced the message that a father is not only a child's first hero but also a lifelong role model.

The event concluded on a cheerful note, leaving behind smiles, laughter and beautiful memories for both parents and children.

Priyadarshani School Moshi continues to create meaningful experiences that strengthen the bond between school, family and children.

# आंतरशालेय रायफल व पिस्तूल नेमबाजी स्पर्धेत ४३ शाळांचा सहभाग

**महाईन्यूज |**
**पिंपरी- चिंचवड**

**कारगिल विजय दिनानिमित्त येथील प्रतिभा इंटरनॅशनल स्कूल आणि डायनॅमिक युथ स्पोर्ट्स फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरशालेय रायफल व पिस्तूल नेमबाजी स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यात आले.**



या स्पर्धेचे उद्घाटन प्रमुख पाहुणे सुभेदार मेजर कॅप्टन भाऊसाहेब तांबे आणि सुभेदार मेजर कॅप्टन संताजी घार्गे यांच्या हस्ते पार पडले. त्यांनी खेळाडूंना प्रोत्साहन देत शालेय स्तरावर नेमबाजीला चालना देणाऱ्या या उपक्रमाचे कौतुक केले.

या आयोजनास कमला एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक सचिव डॉ. दीपक शहा, खजिनदार डॉ. भूपाली शहा, संचालिका डॉ. तेजल शहा व मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. राजेंद्र कांकरीया यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच मुख्याध्यापिका वृंदा मुलतानी-जोशी, उपमुख्याध्यापिका लिझा सोजू आणि शालेय समन्वयक गुलनाज खान यांचे सहकार्य लाभले.

स्पर्धेत पुणे शहर, पिंपरी-चिंचवड, मावळ, जुन्नर, बारामतीसह जिल्ह्यातील ४३ शाळांनी भाग घेतला. १४, १७ व १९ वर्षांखालील, ओपन आणि पॅरा अशा विविध गटांमध्ये १२५ नेमबाजांनी रायफल (ओपन साईट व पीप साईट) आणि पिस्तूल शूटिंग प्रकारात कौशल्य पणाला लावले. डायनॅमिक युथ स्पोर्ट्स फाउंडेशनचे संस्थापक-संचालक रमेश वराडे यांच्या नेतृत्वाखाली ही स्पर्धा पार पडली.

# पिंपरी-चिंचवडमध्ये पार्किंगला शिस्त; नव्या धोरणाला स्थायी समितीची मंजुरी

**महाईन्यूज |**
**पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरातील वाढती वाहनांची संख्या आणि त्यातून निर्माण होणारी वाहतूक कोंडी ही पिंपरी-चिंचवडसाठी एक गंभीर समस्या बनली आहे. त्यावर उपाय म्हणून महापालिकेने नव्याने पार्किंग धोरण आखले आहे. हे धोरण शहराची सुलभता, रस्ते सुरक्षा व शाश्वत वाहतूक व्यवस्थेला प्रोत्साहन देण्यासाठी राबवले जाणार आहे.**



सभेच्या अध्यक्षस्थानी समितीचे अध्यक्ष अभिषेक बारणे होते. वाहनांच्या वाढत्या संख्येमुळे शहरात दरवर्षी वाहतूक कोंडीचा प्रश्न गंभीर होत चालला आहे. उपलब्ध आकडेवारीनुसार, पिंपरी-चिंचवडमध्ये दर १०० रहिवाशांमागे सुमारे ८० खासगी वाहने आहेत. ते प्रमाण अत्यंत जास्त आहे. चुकीच्या व अनियोजित पार्किंगमुळे रस्ते अरुंद होत असून, पादचाऱ्यांचे चालणे कठीण झाले आहे. विशेषतः मेट्रो पिलरखाली, पदपथांवर व व्यापारी केंद्रांजवळ होणारे बेशिस्त पार्किंग वाहतुकीस अडथळा ठरत आहे. शहरामध्ये शिस्तबद्ध, सुरक्षित व शाश्वत पार्किंग व्यवस्था विकसित करण्यासाठी महापालिकेने नवीन धोरण तयार केले आहे. शहरात ३५५ किलोमीटर लांबीच्या रस्त्यांवर झोननुसार हे पार्किंग धोरण राबविण्याचे नियोजन केले आहे. तसेच, शहरातील पार्किंग व्यवस्था अधिक प्रभावी व स्थानिक गरजेनुसार लवचिक ठेवण्यासाठी रस्ता बदल करण्याचे अधिकार क्षेत्रीय समितीला देण्यात आले आहेत.

DTE Code 6310

Approved by AICTE | Accredited by NAAC | Accredited by NBA

PCET- NUTAN

# Nutan Maharashtra Institute of Engineering and Technology

Autonomous Institute | SPPU Affiliated

## Admissions Open for Academic Year 2026–27

| Degree | Programme Name | Choice Code | Intake |
|---|---|---|---|
| B.Tech | Computer Engineering (CE) | 631024510 | 240 |
| B.Tech | Computer Science Engineering (CSE) | 631024210 | 180 |
| B.Tech | Artificial Intelligence & Data Science (AI&DS) | 631099510 | 120 |
| B.Tech | Information Techanology (IT) | 631024610 | 120 |
| B.Tech | CSE Artificial Intelligence (CSE AI) | 631091310 | 60 |
| B.Tech | Electronics and Telecommunication (E&TC) | 631037210 | 120 |
| B.Tech | Mechanical Engineering | 631061210 | 120 |
| B.Tech | Electronics & Computer Engineering | 631084410 | 120 |
| M.Tech | Computer Engineering (CE) | 0631024510 | 12 |
| M.Tech | E&TC (IoT & Sensor System) | 0631095210 | 12 |
| BCA | Bachelor of Computer Applications (BCA) | 0631010110 | 120 |
| MBA | Master of Business Administration (MBA) | 0631010110 | 120 |
| MCA | Master in Computer Application (MCA) | 0631010110 | 120 |
| LL.B. | Bachelor of Laws | 26031 | 60 |
| B.Sc | Cyber and Digital Science (B.Sc) | - | 60 |
| B.Voc. | Bachelor of Vocation (B.Voc.) | - | 180 |

Highest Package for PCET-Nutan
**61 Lakh P.A.**

Average Salary Package
**5.5 Lakh P.A.**

For Admissions Contact:
**8830992988 / 7423080910 / 9028101155**




Scan the QR Code Today to Get More Information

Samarth Vidya Sankul, Vishnupuri, Talegaon Dabhade, Pune – 410507